


**जेस्टॅम्प कंपनी चाकण आणि होप फॉर द चिल्ड्रन्स फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना शाश्वत विकासासाठी नाविन्यता पुरस्कार २०२३ प्रदान**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांनी संस्थात्मक सामाजिक जबाबदारी अंतर्गत सन २०१७ ते २०२२ या कलावधित पुणे जिल्ह्यातील पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या बहिरवाडी हे आदिवासी गाव दत्तक घेतले होते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाने पुढाकार घेऊन बहिरवाडी ग्राम विकास कृती संशोधन प्रकल्प हाती घेतला होता. यामध्ये प्रकल्प संचालक म्हणून डॉ. प्रकाश यादव यांनी गावचे सर्वेक्षण करून गरजा व समस्यांचे अध्ययन केले. गरजांच्या अध्ययनाद्वारे आलेल्या निष्कर्ष द्वारे गाव विकासाचा आराखडा ठरविण्यात आला ज्यामध्ये महिला व बाल विकास, शिक्षण व प्रशिक्षण, जेष्ठ नागरिक कल्याण, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, त्याचबरोबर ग्रामपंचायतचे बळकटीकरण इत्यादी विषयी समाजकार्य हस्तक्षेपाचे नियोजन केले. गावातील विविध सामाजिक गटांना कृती संशोधन प्रकल्प मध्ये सहभागी करून विविध प्रशिक्षण कार्यक्रम तसेच क्षमता बांधणी उपक्रम मागील पाच वर्षात पार पाडले. विशेषता बहिरवाडी गावातील १४० महिलांचे १४ बचत गट स्वयंसहायता समूह तयार करून त्यांना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उमेद अभियानाशी संलग्न केले. या अभियानांतर्गत महिलांना कुक्कुटपालन शेळीपालन दुग्ध व्यवसाय इत्यादी बाबतचे स्वयंरोजगार प्रशिक्षण देण्यात आले. आज गावातील जवळपास सर्वच महिलांकडे कोंबड्या, शेळ्या मेंढ्या आहेत आणि त्याद्वारे त्यांना चांगले

उत्पन्न मिळत आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे शास्वत उपजीविकेचे साधन निर्माण झाले आहे. तसेच अहिल्यादेवी ग्राम संघाच्या वतीने गावामध्ये हॅचरी मशीनद्वारे नवीन कोंबड्यांच्या पिल्लांची निर्मिती केली जाते तसेच शेवई मशीन द्वारे शेवयाचा उद्योग करून उन्हाळ्यामध्ये चांगले उत्पादन घेतले जाते आणि मिरची कांडप मशिन द्वारे उद्योग करून चांगले उत्पन्न घेतले जाते. या प्रकारे असे अनेक शाश्वत उपजीविकेचे प्रयत्न डॉ. प्रकाश यादव समाजकार्य विभाग टिळक महाराज विद्यापीठ पुणे तसेच विविध अशासकीय सामाजिक संस्था आणि पुरंदर पंचायत समिती पुरंदर यांच्या वतीने घेण्यात आले आहेत.

गेल्या पाच वर्षामध्ये करण्यात आलेल्या शाश्वत उपजीविकेसाठी आणि विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून गावातील नागरिकांच्या जीवनमानात बदल आणल्याबद्दल आणि त्यांच्या जीवनाची गुणवत्ता वाढविल्याबद्दल जेस्टॅम्प कंपनी चाकण आणि होप फॉर द चिल्ड्रन्स फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने  टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे तसेच समाजकार्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रकाश यादव, यांना शाश्वत विकासासाठी नाविन्यता पुरस्कार २०२३ हा रुपये पाच लाख धनादेश, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देवून सन्मान व प्रदान करण्यात आला.

आजच्या कार्यक्रमासाठी जेस्टॅम्प कंपनीच्या मानव संसाधन व्यवस्थापक, प्रियांका, आणि त्यांचे सहकारी तसेच फॉर द चिल्ड्रन्स फाऊंडेशन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कॅरोलिन, व्यवस्थापक, शकील शेख आणि अंकिता कोठारी हे उपस्थित होते तसेच

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे सचिव, श्री. अजित खाडीलकर उपस्थित होते. त्यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या बद्दल उपस्थितांना सविस्तर माहिती दिली तसेच डॉ. प्रकाश यादव यांनी बहिरवाडी ग्राम विकास कृती संशोधन प्रकल्प याविषयी सादरीकरण करून गाव विकासाची पुढील दिशा मांडली. डॉ. कॅरोलिन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर शकील शेख यांनी आभार प्रदर्शन केले.

बहिरवाडी ग्रामविकास कृती संशोधन प्रकल्पाला मार्गदर्शन करणारे विद्यापीठाचे कुलपती, त्याचबरोबर विद्यापीठाच्या कुलगुरू, कुलसचिव, सचिव, अधिष्ठाता, आणि सर्व विभागप्रमुख यांचे मनःपूर्वक आभार. समस्त बहिरवाडी ग्रामस्थ आणि अहिल्यादेवी महिला ग्राम संघ बहिरवाडी यांच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचे विशेष आभार. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांनी बहिरवाडी गावामध्ये आपले शेत्र कार्य तसेच विविध प्रशिक्षण पूर्ण केले त्यांचे देखील विशेष आभार. आमच्या समाजकार्य विभागातील सर्व शिक्षक व शिक्षक तर सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार!